# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २०/०८/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६८४** — **विषय क्रमांक- ६८४**

**दिनांक - २०/०८/२०२४** — **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ६८४ दिनांक २०/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सा.प्र.वि/०२/कावि/४८०/२०२४, दि.१२/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०० दि.१३/०८/२०२४ अन्वये, शहर परिवर्तन कार्यालय (CTO) चे कामकाजासाठी सामान्य प्रशासन विभागासाठी नवीन लेखाशिर्ष तयार करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६८४ दिनांक- २०/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सा.प्र.वि/०२/कावि/४८०/२०२४, दि.१२/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०० दि.१३/०८/२०२४ अन्वये, मनपाचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील सन २०२४-२०२५ च्या मुळ अंदाजपत्रकातील सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस या लेखाशिर्षावरुन र.रु.३,४३,५२,९१०/- इतकी तरतुद सामान्य प्रशासन विभागाकडील "सल्लागार फि खर्च" या नवीन लेखाशिर्षावर वर्ग करून सुधारीत तरतुदीस मान्यता देणे आवश्यक आहे.<br>आदेश क्र.सा.प्र.वि/०२/कावि /४१४/२०२४ दि.१८/०७/२०२४ अन्वये City Transformation Office (CTO) चे कामकाजासाठी क्र. मातंवि ०८/२०२०-२१ अन्वये नेमणेत आलेल्या मे. Palladium Consulting Pvt.Ltd. या कामकाजाकरीता निविदा क्र.१६/२०१९-२० अन्वये नेमणेत आलेल्या संस्थेचे वार्षिक देयकापोटी बीलाची अदायगी करणेकामी आवश्यक अंदाजपत्रकीय तरतुद माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे लेखा विभागाने तातडीने वर्ग करणेत यावी असे नमूद केलेले आहे.<br><br>त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडे नवीन लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन २०२४-२५ चे सुधारित अंदाजपत्रकात महसूली खर्च भाग १ मधील खालील लेखाशिर्षावर करणेत आलेली अंदाजपत्रीय तरतूद झालेला खर्च व उपलब्ध शिल्लक यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. |

| | |
|---|---|
| | <table><tr><td>लेखाशिर्षाचे नाव</td><td>सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस</td></tr><tr><td>अंदाजपत्रकीय तरतूद</td><td>४,२५,००,०००/-</td></tr><tr><td>झालेला खर्च</td><td>८१,४७,०९०/-</td></tr><tr><td>शिल्लक रक्कम</td><td>३,४३,५२,९१०/-</td></tr></table><br>उपरोक्त नमूद केले प्रमाणे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील सन २०२४-२०२५ च्या सुधारित अंदाजपत्रकात सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस या लेखाशिर्षावर र.रु.४,२५,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली असून दि.०६/०८/२०२४ अखेर र.रू.३,४३,५२,९१०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.<br>त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाकडे "सल्लागार फि खर्च" या नवीन लेखाशिर्षावर सदरची शिल्लक तरतुद र.रु.३,४३,५२,९१०/- वर्ग करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा. प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा .प्रशासक ठराव क्रमांक – ६८५** **विषय क्रमांक - ६८५**

**दिनांक - २०/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ६८५ दिनांक** २०/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/५११/२०२४,दिनांक - १९/०८/२०२४ अन्वये, मनपाचे 'मुख्य अभियंता-२' पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत**.** |
| **ठराव क्र. ६८५ दिनांक-** २०/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/२/कावि/५११/२०२४,दिनांक - १९/०८/२०२४ अन्वये'मुख्य अभियंता-२' अभिनामाचे रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १६/०८/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br>महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीसीसी- |

| | |
|---|---|
| | २०२३/प्र.क्र.२३/नवि-२२ दि.२३ ऑगस्ट ,२०२३ नुसार सह शहर अभियंता (स्थापत्य) या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ .सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार श्री.कुलकर्णी संजय नारायण, सह शहर अभियंता (पर्यावरण) यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मा. महापालिका सभेच्या मान्यतेने मुख्य अभियंता-२ या रिक्त पदावर पे.लेवल S-२७ वेतनश्रेणी ११८५००-२१४१०० मध्ये शासन मान्यतेच्या अधिन तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतच्या विषयास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा. प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**